ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 173

वर्ष १८ | पुणे, बुधवार, ६ सप्टेंबर, १९७२ | अंक १७

## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड





स्वच्छंद मजेत हवं तसं मुक्तपणे भटकणाऱ्यासाठी ठाकरसींचं मोकळं मोकळं वाटणारं
सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, व्हॉयल्स, कॅम्ब्रिक्स – कुठेही
गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना
किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसींच्या
सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची
प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल
तर त्यासाठी ठाकरसींच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही. अगदी हवे तसे
हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तलम कापड, गाउन्स,
फ्रॉक वगैरेंचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसींचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड'
असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
क्राऊन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई – १.

**विजेचे दर २०% वाढणार** — महाराष्ट्रातील विजेच्या दरात १ ऑक्टोबरपासून सुमारे २० % वाढ होणार आहे.

**स्कूटर्सचे उत्पादन वाढले** — १९७०-७१ मध्ये ७०,३१८ स्कूटर्स, मोपेड्स आणि स्कूटरेटस् ह्यांचे उत्पादन झाले होते; १९७१-७२ मध्ये त्यांची संख्या ८४,४१४ झाली. ह्याच मुदतीत मोटरसायकलींचे उत्पादन ३८,८५५ चे ४४,०६४ वर गेले. मोटरगाड्यांचे उत्पादन ३६,८१९ वरून ४०,५६१ वर गेले. जीप्सचे उत्पादन ९,८४६ वरून ११,२२७ वर गेले.

**बँकांच्या नव्या कचेऱ्या** — भारतातील बँकांनी जून १९७२ अखेरच्या सहा महिन्यांत ६४० शाखा उघडल्या. गेल्या तीन वर्षांत बँकांनी एकूण ५,३५८ शाखा उघडल्या. म्हणजे दरमहा १४८ किंवा दररोज तीन नव्या शाखा, असा हिशेब होतो.

**सत्याग्रह्यांच्या तोंडाला चिकटपट्टी**—बैरूत येथील ४८३ पहारेकऱ्यांनी वेतनवाढीसाठी उपोषण चालविले आहे. त्यांपैकी कुणी काही खाऊ नये म्हणून त्यांच्या संपाच्या पुढाऱ्यांनी त्यांची तोंडे चिकटपट्टीने बंद करून टाकली आहेत.

**पुण्यातील नवीन हॉटेल**—सफायर हॉटेल लि. पुण्यात एक नवे हॉटेल उभारीत आहे. त्याला ४७ लक्ष रु. खर्च येईल. त्यांपैकी १५ लक्ष रु. इक्विटी भागाचे रूपाने उभारले जातील आणि हॉटेल डेव्हलपमेंट लोन फंडाकडून २८ लक्ष रु. चे कर्ज मिळेल. बाकीच्या खर्चाची तरतूद बँकांच्या कर्जातून केली जाईल. हॉटेलात ६७ खोल्या असतील व त्यात एकूण ११० जणांची राहण्याची सोय होईल.

**शहरांची वर्गवारी खर्चाच्या इंडेक्स नंबराप्रमाणे करा** — शहरांची वर्गवारी त्यांच्या लोकसंख्येनुसार न करता त्यांतील राहणीच्या खर्चाच्या इंडेक्स नंबरानुसार करण्यात यावी, अशी मागणी लोकसभेत करण्यात आली. पे कमिशनच्या विचाराधीन हा प्रश्न असल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले.

**सिनेमा-तिकिटांच्या काळ्याबाजाराबद्दल अटक**— सिनेमातिकिटांचा काळाबाजार करण्याच्या आरोपावरून १९७१ मध्ये बृहन्मुंबईत ३,९८९ लोकांना अटक करण्यात आली. चालू वर्षाच्या जून अखेर अशा लोकांची संख्या १,४८३ भरली.

**बांगला देशात कपड्यांची तातडीने आयात** — बांगला देश भारताकडून ५ कोटी रुपयांचे कपडे (लुंग्या, साड्या, कापड इ.) तातडीने आयात करणार आहे. विमानाने ही आयात केली जाईल. संबंध बांगला देशभर एका ठराविक दराने ह्याची विक्री केली जाईल.

**किरकोळ नाण्यांचे एकूण चलनाशी प्रमाण** — १९५६ मध्ये एकूण चलनाशी किरकोळ नाण्यांचे प्रमाण ३·९% होते ते ३१ मार्च, १९७२ रोजी ३·०८ वर उतरले. म्हणजे, एकूण ४८२२·४५ कोटी रु. चलनात किरकोळ नाणी १४८·४३ कोटी रु. ची होती. मोड मिळण्यातील अडचणीचे हे कारण आहे.


**A Short Course in Techniques of Sales Management**
**for**
**Senior Executives of Co-operative Business Organisations.**

**Place :–** VMNICM, Poona 16.

**Duration :–** Three Weeks (27th September to 18th October, 1972).

The Course is intended for Senior executive officers of large co-operative business organisations, such as Marketing, Processing, Consumers, Industrial and other Production Co-operatives.


It would cover such important areas as Planning and organisation of Sales, Marketing Policies, Pricing Techniques, Public Relations, Market Research, Marketing Finance etc.

For further particulars, please contact :—
The Registrar,
Vaikunth Mehta National Institute of Co-operative Management,
Reserve Bank of India Building,
Ganeshkhind Road,
**POONA-16.**



बँकेच्या 'धनवर्धिनी' ठेव योजनेतील एक योजना

**संचित मुदत ठेव**



इतक्या वेगाने आणि मोठ्या प्रमाणात
आपण संचय करू शकला नाही तरी सुद्धा
सातत्याने केला जाणारा आपला लहान संचय
आपली संचित मुदत ठेव वाढविते.

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**

स्थापना १९३६ | मुख्य कार्यालय
चिपळूणकर निकेतन, राजपथ सातारा. | शेड्यूल्ड बँक

**महाराष्ट्रात सर्वत्र शाखा**

☆ अर्थ ☆

बुधवार, ६ सप्टेंबर १९७२



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## चलनवृद्धीला आळा घालण्याची मागणी

फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संघटनेने आर्थिक नियोजनाच्या कार्यक्रमाकडे पाहण्याचा स्वतःचा दृष्टिकोन एका अहवालात स्पष्ट केला आहे. अहवालात असे म्हटले आहे की सध्या जी सार्वत्रिक किंमतवाढ झाली आहे तिची दोन प्रमुख कारणे आहेत. एक तर देशात जरुरीच्या वस्तूंचा साठा पुरेसा नाही; दुसरे म्हणजे पैशाच्या पुरवठ्यात प्रमाणाबाहेर झालेली वाढ. ह्या दोन कारणांचा विचार होऊन उपाय योजण्यात आल्याशिवाय फक्त व्यापाऱ्यांना दोष देऊन काही उपयोग होणार नाही. आर्थिक विकास साधण्यासाठी जी कामे हातात घेण्यात येतील त्यांची दिशा अधिक लोकांना काम देण्याची व अपुरे काम असणाऱ्यांना पूर्ण काम देण्याची असली पाहिजे. विकासाच्या कामांना अशी दिशा देण्यात आली तरच १९७८-७९ च्या सुमारास दारिद्र्याच्या रोगावर थोडाबहुत उतारा मिळू शकेल. तथापि नोकऱ्या उत्पन्न करताना अनुत्पादक कामे टाळून उत्पादक कार्यक्रमावर जोर देण्यात आला पाहिजे. विशेषतः गरजेच्या वस्तू निर्माण करणाऱ्या रोजगारांना संधी उपलब्ध केल्या गेल्या पाहिजेत. तरच चलनवृद्धीमुळे अर्थव्यवस्थेत उत्पन्न झालेला दाब कमी होईल. म्हणून, अन्नधान्याच्या उत्पादनावर देण्यात येत असलेला जोर चालू ठेवण्यात आला पाहिजे. त्याचबरोबर नगदी पिकाकडे खास लक्ष देण्यात आले पाहिजे. औद्योगिक वाढ होण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्थेसंबंधीच्या कल्पना निश्चित करण्यात आल्या पाहिजेत आणि भांडवल गुंतवणुकीला उत्तेजन देण्यात आले पाहिजे.

---

## अमेरिकन समाजशास्त्रज्ञावर पडलेला भारताचा प्रभाव

अमेरिकेतील रॉकफेलर फाउंडेशन ह्या संघटनेचे माजी डायरेक्टर मि. गिलपॅट्रिक भारतात सात वर्षांपेक्षा अधिक काळ राहून मायदेशी परत गेले. तेथे गेल्यावर त्यांनी दिलेल्या एका मुलाखतीत त्यांच्यावर आधुनिक भारताच्या पडलेल्या प्रभावाचे चांगले दर्शन होते. ते समाजशास्त्रज्ञ असून भारतामधील आपल्या वास्तव्यात त्यांना येथील जीवनाचा सखोल अभ्यास करण्याची संधी मिळाली. ते म्हणतात की भारतात आता उत्साहाचे वातावरण तयार झाले आहे. आर्थिक विस्तार, भांडवल-गुंतवणूक आणि उत्पादन ह्या तिन्ही बाबतींत भारताने विलक्षण प्रगती केलेली आहे. ह्या प्रगतीला आधुनिक इतिहासात तोड नाही. झालेल्या प्रगतीवरून भविष्यकाळही असाच राहील असे दिसत आहे. भारत-पाकिस्तान ह्यांच्यात नुकत्याच झालेल्या युद्धात हिंदी लोकांनी शिस्तीचे अतिशय उत्तम पालन केले. दुसऱ्या महायुद्धात १९४१ साली लंडनमध्ये सुद्धा नव्हती इतकी चांगली नागरी संरक्षण व्यवस्था दिल्लीत दिसून आली. युद्धाच्या तिसऱ्याच दिवशी दिल्लीसारख्या अस्ताव्यस्त पसरलेल्या शहरात रात्री प्रकाशाचा एखादा किरणही दिसत नव्हता. सामाजिक शिस्त उच्च दर्जाची होती. प्रकाशबंदीच्या दोन आठवड्यांच्या काळात शहरात चोऱ्या जवळ जवळ झाल्याच नाहीत. सामाजिक कर्तव्ये पार पाडण्याच्या बाबतीत अंतःस्फूर्तीने आणि सहजपणे जेव्हा एखाद्या देशातील जनता शिस्तबद्ध होते त्या वेळी त्या देशाला अभिमान वाटणे साहजिकच म्हटले पाहिजे. शिस्त, सहकार्य आणि वागणुकीतील गांभीर्य हे गुण भारतात परक्या लोकांच्या अस्तित्वाने नांदत होते, असा अनेकांचा समज होता.

---

## ब्रिटिश बांगला देश बँकेची स्थापना होणार

बांगला देशात गेल्या वर्षी पाकिस्तानी लष्कराची क्रूर दडपशाही चालू असता ब्रिटिश पार्लमेंटच्या काही मजूर सभासदांनी ब्रिटनमधील लोकमत बांगला देशाला अनुकूल करण्याची बरीच खटपट केली. अशा न्यायप्रिय लोकांत मि. स्टोनहाउस हे होते. त्यांच्या पुढाकाराने आता ब्रिटनमध्ये ब्रिटिश बांगला देश बँकेची स्थापना करण्याचे प्रयत्न होत आहेत. ही बँक स्थापन झाल्यावर ब्रिटनमध्ये राहणाऱ्या बांगला देशाच्या नागरिकांचा आर्थिक पाठिंबा तिला साहजिकच मिळू लागेल. ब्रिटनमध्ये बांगला देशाच्या नागरिकांची संख्या जवळपास १ लाखाच्या घरात आहे आणि त्यात मुख्य भरणा बंगाली खलाशांचा आहे. संकल्पित बँक ब्रिटनमध्ये एक कंपनी म्हणून रजिस्टर करण्यात यावयाची आहे. पण तिचे स्वरूप केवळ बँकिंग कंपनी असे राहणार नसून बांगला देशाच्या आर्थिक विकासाला सर्वतोपरी साह्य करणारी वित्तीय संस्था असे राहणार आहे. बांगला देशाच्या सरकारने ह्या नव्या संघटनेला मान्यता दिली आहे. मात्र स्टेट बँक ऑफ बांगला देश ह्या संघटनेच्या कार्याशी तिचा विरोध राहू नये अशी अट घातली आहे. ब्रिटनमधील संकल्पित बँकेची स्थापना करण्यासाठी एक ट्रस्ट निर्माण करण्यात आला आहे. ह्या ट्रस्टच्या भांडवलाची उभारणी संयुक्त रीत्या करण्यात येणार असून त्यात ब्रिटिश भांडवलाचे वर्चस्व असेल. मि. स्टोनहाउस ह्यांनी ब्रिटनमधील

व्यापारी कंपन्या आणि धंदेवाले ह्यांच्याशी सल्लामसलत केलेली आहे. त्यावरून असे दिसते की नवी कंपनी निदान ६० लाख रुपयांच्या भांडवलानिशी उभारण्यात येईल.

---

**आफ्रिकेवर छाप पाडण्यासाठी रशिया व चीन ह्यांची स्पर्धा**

१९६३ च्या डिसेंबरमध्ये चीनचे पंतप्रधान चौ एन-लाय आफ्रिकेच्या दौऱ्यावर गेले होते. तेथे त्यांनी १० देशांच्या प्रमुखांशी आणि २०० मंत्र्यांशी बोलणी केली. 'आफ्रिका' क्रांतीला सज्ज झाला आहे असे त्यांनी जाहीर केले. परंतु चिनी शिष्टमंडळाबद्दलची आपुलकी लवकरच मावळली. रशियनांनी आफ्रिकेवर छाप पाडण्याचा प्रयत्न केला, त्याचाही तसाच शेवट झाला. १९६५ च्या सुमारास बुरुंडी, सें. आफ्रिकन रिपब्लिक, घाना, येथून चिन्यांना हाकलून देण्यात आले. कम्युनिस्ट पक्ष (मॉस्को छाप आणि पीकिंग छाप, दोन्हीही) बेकायदा ठरविण्यात आले. आफ्रिकेत कम्युनिझमला प्रतिसाद उरला नाही परंतु आता चिनी आणि रशियन पुन: आपले बस्तान बसवू बघत आहत. दोघेही आफ्रिकेवर छाप बसविण्यासाठी एकमेकांशी स्पर्धा करीत आहेत. विकासकार्याच्या कार्यक्रमांना मदत करणे, हे त्यांचे शस्त्र आहे.

रशिया चीनपेक्षा अधिक समृद्ध असल्यामुळे रशियाची मदत करण्याची शक्ती जास्त आहे. समाजवादी असोत वा नसोत, कोणत्याही आफ्रिकी देशाशी संबंध जोडण्यास रशिया उत्सुक आहे. सुमारे ३६ आफ्रिकी देशांचा रशियाशी व्यापार चालतो आणि ३० देशांशी रशियाचे राजनैतिक संबंध आहेत. चीनचा दावा असा आहे: "रशिया अधिक देऊ शकत असला, तरी चीनची मागणी अल्प आहे; रशिया आफ्रिकी देशांचा गैरफायदा घेऊ पाहतो, पण चीन त्यांना मदत करू इच्छितो." गेल्या दहा वर्षांत रशियाने जेवढी मदत दिली त्याच्या एक चतुर्थांशाइतकीच चीनने दिली. परंतु चिनी मदत वाढत आहे. चीनच्या परराष्ट्रांना दिलेल्या मदतीपैकी निम्मी मदत आफ्रिकेतील देशांना मिळते. टॅनझॅनिया आणि झँबिया ह्यांना जोडणारी १,१०० मैल लांबीची 'टॅनझम' रेल्वे ह्या चिनी मदतीचा सर्वांत मोठा कार्यक्रम आहे. अधिकाधिक देश चीनशी संबंध जोडू पाहात आहेत. पण अजून तरी पाश्चात्य देशांची (अमेरिकन आणि प. युरोपियन) पकड रशियन आणि चिनी पकडीपेक्षा जुनी आणि मजबूत आहे.

---

**पत्रावर पी. आय. एन. कोड नंबर लिहा**

पोस्ट खात्याने पोस्टल इंडेक्स नंबर तयार केले आहेत. पोस्टाचे गाव किंवा बटवडा करणारे पोस्ट ऑफिस ही त्या सहा अंकी इंडेक्स नंबरात समाविष्ट करण्यात आली आहेत. हा इंडेक्स नंबर पाकिटावरील किंवा कार्डावरील पत्त्याच्या शेवटी लिहावयाचा आहे. त्यामुळे सॉर्टिंगचे काम सोपे होणार आहे. भाषेची अडचण भासणार नाही. हे इंडेक्स नंतर दिलेल्या डिरेक्टरी लवकरच पोस्ट ऑफिसातून विकत मिळू लागतील.



### औद्योगिक वाढीच्या वेगात भारत मागासलेला

दक्षिण आशियातील देशांची वर्गवारी औद्योगीकरणाच्या दृष्टीने तीन गटात करता येते. ह्या गटात निम-औद्योगिक, औद्योगीकरणाची वाटचाल करीत असलेले आणि औद्योगीकरण मुळीच होत नसलेले सात देश आहेत. १९६० ते ६९ ह्या दशकात दक्षिण आशियातील ह्या देशांच्या औद्योगिक वाढीचा वेग निरनिराळा दिसून येतो. भारताचा ह्या काळातील वार्षिक सरासरी वेग २·५ टक्के इतका आहे. उद्योगधंद्यातील उत्पादनाच्या ठोक वाढीचा हा वेग वर उल्लेख केलेल्या गटातील सर्वात कमी आहे. भारताच्या खाली फक्त नेपाळचा अनुक्रम आहे. पण नेपाळचा उल्लेख औद्योगिक देश म्हणून करण्यासारखा नाहीच. भारताशी तुलना करता सिलोनचा वाढीचा सरासरी वार्षिक वेग ११·८ टक्के व इराणचा ११ टक्के असा आहे. पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि ब्रम्हदेश ह्या देशांचा हाच वेग अनुक्रमे ७·६ टक्के ४·३ टक्के आणि ३·५ टक्के असा आहे. दक्षिण आशियांतील देशात भारताची एकट्याचीच गणना निम-औद्योगिक देशात करण्यात येते. सिलोन, इराण, पाकिस्तान व ब्रम्हदेश ह्यांची गणना औद्योगीकरणाची वाट चालणाऱ्या देशांत होते. बिगर-औद्योगिक देश म्हणून नेपाळबरोबरच उल्लेख करण्यात येणारा दुसरा देश म्हणजे अफगाणिस्तान हा एकच आहे. नेपाळ आणि अफगाणिस्तान सोडले तर दरडोई सरासरी वार्षिक उत्पन्नाच्या वाढीच्या बाबतीतही भारताचा अनुक्रम सर्वात शेवटचा लागतो. ह्या बाबतीत पाकिस्तान भारताच्या पुढे आहे.

---

### बेकारांची पद्धतशीर लूट करण्याचा धंदा

पश्चिम बंगालमधील बेकारीची गंभीर समस्या सर्वांना ठाऊक आहे. त्या राज्यातील बेकारांची संख्या २८ लाखांच्या घरात गेलेली आहे. अर्थातच नोकरीच्या शोधार्थ हजारो तरुण भटकत असतात. त्यांच्या ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन स्वतःचे खिसे गरम करणारे अनेक लोक कलकत्त्यात वावरत असतात. त्यांच्यापैकी काही लोक केवळ रिकाम्या जागेची माहिती पुरवून बेकारांना नागवितात तर काही लोक नोकरी मिळण्यासाठी यावयास लागणारी ठेव घेण्याच्या निमित्ताने पैसे गोळा करतात. अनुभव मात्र असा येतो की मुळात नोकरी नसतेच; अगर असलीच तर दोन दिवसापूर्वीच ती भरली गेलेली असते. पण ही झाली फसवणूक करणाऱ्या एकट्या-दुकट्या माणसाची गोष्ट. काही लोक वरवर ठीक व कायदेशीर दिसणाऱ्या संघटना स्थापतात, गरजूंच्या मुलाखती घेतात आणि त्याही एखाद्या मोठ्या भव्य हॉटेलमधील खोलीत. अशा संघटित बनवाबनवीचा पुरावा अर्थातच मिळत नाही आणि आशेच्या सूक्ष्म तंतूवर हेलकावे खाणारे बेकार तरुण सरळ फसगती पडतात. सध्या बंगालमध्ये अशी हवा आहे की बेकारी दूर करण्याच्या कोणत्याही उपायाला कायदेमंडळाचे सभासद, सरकारी कारभारी, व्यापारी व सामाजिक संघटना आपला पाठिंबा तत्परतेने जाहीर करतात. ह्याचा फायदा घेऊन बेकारी निवारणासाठी अनेक संघटना स्थापन झाल्या आहेत. प्रत्यक्ष व्यवहारात बेकारांना त्यांचा किती फायदा होतो हे कळत नाही. पण संघटना मात्र बेकारांच्या नावाने बँकांकडून कर्जे मिळवीत आहेत व स्थानिक करापासून सूट मिळवीत आहेत.

---

### औषधे घेण्यामागील रोग्यांची मनोवृत्ती

आंध्र प्रदेशात दरसाल २० कोटी रुपयांची आधुनिक औषधे खपतात. त्यांतही किनारपट्टीवरील गंटूर, कृष्णा आणि पश्चिम गोदावरी ह्या जिल्ह्यांत ती अधिक प्रमाणात खपतात. ह्याचा अर्थ लोक अनेक प्रकारच्या रोगांनी पछाडलेले आहेत असा करता येईल काय? ह्या प्रश्नावर प्रकाश पाडण्यासाठी काही डॉक्टर्स आणि औषधांच्या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांच्याकडे विचारणा करण्यात आली. तेव्हा एक डॉक्टर म्हणाले की आंध्रमधील रोग्यांची मनोवृत्ती औषधांच्या खपाला कारण आहे. बाटलीतील औषधाने अगर एखाद्या गोळीने काम होण्यासारखे असले तरी बरेच रोगी सुई टोचण्याचा आग्रह धरतात. डॉक्टरने रोग्याच्या म्हणण्याप्रमाणे केले नाही तर त्याचे गिऱ्हाईक मात्र जाते. औषध कंपनीचा एक अधिकारी म्हणतो की आंध्रमधील रोगी क्रमाने घेण्यास तयार नसतो. त्याला झटपट गुण यावा असे वाटते. आरोग्यासाठी सढळ हाताने पैसे खर्च करण्यास तो मागेपुढे पाहात नाही. शिवाय औषध जितके महाग तितके ते अधिक गुणकारी, अशी त्याची समजूत आहे. एकंदरीने औषधे घेण्याची लोकांची प्रवृत्तीच प्रबळ आहे. समजा एखाद्या माणसाला अशक्तता वाटत असली, आणि त्याला जर रोज एक अंडे खाण्यास सांगितले तर तो तसे करणार नाही. पण त्याला एखादा शक्तिवर्धक आयता अन्नपदार्थ घेण्यास सांगा; तो तावडतोब तयार होईल. आयता ह्याचा अर्थ असा की, त्यांच्या जाणिवेत आरोग्यापेक्षा औषधाला अधिक महत्त्वाची जागा प्राप्त झालेली आहे. श्रीमंत वर्गात निष्कारण निराश होणारांची संख्या अधिक प्रमाणात दिसते. मग ते आपणाला कसला तरी रोग झाला आहे अशी खरी-खोटी समजूत करून घेतात.

---

### पत्नीच्या संतति-प्रतिबंधक शस्त्रक्रियेस पतीच्या संमतीची आवश्यकता नाही

स्त्रियांना संतति-प्रतिबंधक शस्त्रक्रिया ( टयूबेक्टॉमी ) करवून घ्यावयाची असल्यास पतीची लेखी संमती आवश्यक होती. "माझ्या पतीची ह्या शस्त्रक्रियेला हरकत नाही" एवढे त्यांनी म्हटले म्हणजे आता पुरे होईल, अशी नियमात सुधारणा करण्यात आली आहे. पुरुषांना संतति-प्रतिबंधक शस्त्रक्रिया करवून घेण्यासाठी पत्नीची संमती ह्यापूर्वीही आवश्यक नव्हती. स्वतःच्या लेखी मागणीवरून ( पत्नीची संमती न घेता ) गर्भपात घडवून आणण्याची स्त्रियांना मोकळीक कायद्याने दिलेलीच आहे.

# औद्योगिक अंतर्गत सभांचा उद्देश आणि फलश्रुती

लेखक : विजय गोखले

सभा म्हटलं म्हणजे चार लोक एकत्र येणार, काही मुद्द्यांवर चर्चा करणार हे ओघाने आलेच; मग त्या राजकीय सभा असोत किंवा औद्योगिक सभा असोत. ह्या व अशा सभेमध्ये निर्णय घेतले जातात किंवा निर्णयाप्रत येऊन पोहचतात. बस्स्, त्यापुढील भाग मात्र वेगळा वेगळा होत जातो. निर्णय एक व प्रत्यक्ष कामाचे स्वरूप ह्यांमध्ये मोठी दरी उभी राहते. अर्थात त्याला अनेक कारणे असू शकतील, पण त्याचा विचार अशा सभांच्या-वेळी का होऊ शकत नाही व तो होत असल्यास मार्ग का बदलला जात नाही ?

विशेषत: औद्योगिक अंतर्गत सभा ह्या साधारणपणे उत्पादन व त्या अनुषंगाने उपस्थित होणाऱ्या प्रश्नांवरती भरल्या जातात. पण प्रत्यक्ष चर्चा ऐकण्याचा योग आला तर असे दिसून येईल की दुसऱ्याने काय केले नाही व त्यामुळे आपणांस काय जमले नाही ह्याचाच ऊहापोह जास्त होत असतो. शेवटी चहाच्या वेल्यात ते वावळ अनिर्णित ठरून पुढील सभेवर ढकलले जाते. अशा सभा परिणामकारक ठरण्यापेक्षा काही व्यक्तींचा अट्टाहासच ठरू शकतो. त्या सभेचे वृत्तांत टंकलिखित केले जातात, त्यावर सही करावयास मिळाली व अशा सही केलेल्या कागदांचा ढीग पाहिला, म्हणजे समाधान मानणाऱ्या व्यक्ती ह्या औद्योगिक समाजात सहजतेने पाहावयास मिळतात.

कोणताही निर्णय सभा भरवून त्यात चर्चा होऊन मग तो अमलात आणावा हे लोकशाहीच्या आजच्या युगात स्वागतकारकच होय. पण विषय काय व तो चर्चेला यावा किंवा नाही ह्याचे भान न राहून त्याचा विपर्यास होतो.

सभा म्हणजे चव्हाटा नव्हे. कोणी काय केले, कशा प्रकारे केले, कसे कसे केले, कोणाकडून करवून घेतले, हे जर सभेत सांगत बसले तर अशा सभांना वेळच पुरणार नाही. विषयापुरते महत्त्वाचे व मोजके बोलणे, त्यांतून निर्माण झालेल्या समस्या त्वरित सोडवणे एवढाच अंतर्गत सभेचा हेतू असावा. चुकांचा डोंगर सभापतीपुढे कथन करून वा दुसऱ्याचे उणेदुणे काढून कशी सभा गाजवली किंवा सभेचा वृत्तांत लिहून त्यावर सह्या करण्याचा मान कसा मिळवला व अशा तऱ्हेचे फतवे मी काढले ही शेखी मिरविण्याचा सभेचा उद्देश नसतो, एवढे जरी झाले तरी अंतर्गत सभांचे कार्य समंजसपणे व सहजगत्या यशस्वी होण्यास मदतच होईल.

सभेचे उद्देश व त्यानुरूप येणारे संभाव्य प्रश्न, त्यासाठी लागणारी माहिती जर सभेपूर्वी येतानाच काढली तर बघून सांगतो, दुय्यम अधिकाऱ्याला विचारून सांगतो किंवा असे का ? मला माहीतच नव्हते ! ही सांगण्याची पाळी येणार नाही. प्रत्येकाने सभेला येताना आपापल्या विषयाची परिपूर्ण माहिती तयार ठेवूनच यावे अशी अपेक्षा असते. तसे झाल्यास सभेचे कामकाज थोडक्यात व शिस्तशीर आटपू शकते व येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा विनाकारण माहिती मिळवण्यात व आपल्यावरील विषयाला कलाटणी देण्यात वेळ जाणार नाही. ठरल्यावेळी हजर राहणे व येणाऱ्या विषयात रस घेऊन आपले त्यासंबंधी अनुभव थोडक्यात सांगणे ही एक कला आहे.

अंतर्गत सभेचा उद्देश जाहीर असल्यावर, दुसरा प्रश्न येतो की अशा सभांना कोणकोणाला बोलवावयाचे ? तसे पाहिले तर ज्या व्यक्तीचा संबंधित विषयाचा अभ्यास आहे अगर ज्यांना काही वैशिष्ट्यपूर्ण, ज्ञानयुक्त, अनुभवयुक्त सांगता येईल अशांचीच गरज जास्त असावी. आयत्या वेळच्या विषयावर चर्चा करण्यास पाहुणे सभासदास जरूर बोलवावे. परंतु अशा सभांतून गैरहजर सभासदाचे विषयावर चर्चा करणे टाळावे; निदानपक्षी निर्णय तर मुळीच घेऊ नयेत. अमुक तमुक ह्याचा पगार, त्याचे वरिष्ठाकडे जाणे येणे, ह्यांवर व्यक्तींना सभेला बोलावणे घातुकच ठरावे. बरेच वेळा असे आढळते की सर्वच अधिकारी वर्गाला सभेला बोलावले जाते, त्याचे कारण कोणताही ज्येष्ठ अधिकारी दुखावला जाऊ नये; पण त्यामुळे कनिष्ठ नोकरवर्ग काम बाजूला सारून गप्पागोष्टीत दंग होतो, व अशा सभांच्या वेळी बाहेरील पाहुण्यांचे स्वागतही करण्यास कोणी नसतो, महत्त्वाचे कागदपत्र जाऊ शकत नाहीत, शिवाय अनिच्छेने आलेल्या व्यक्ती पेंगतानाही पाहावयास मिळतात.

अंतर्गत सभा जरूर बोलवा, पण त्याचे उद्दिष्ट व मर्यादा ध्यानात घेऊनच वाजवी चर्चा करा व निर्णय घ्या; म्हणजे सहजसुलभ कार्यसिद्धी होईल.

---

## दहा प्रमुख उद्योगसमूहांची मालमत्ता

| | १९६६–६७ कोटी रु. | १९६७–६८ कोटी रु. | १९६९–७० कोटी रु. |
|---|---|---|---|
| १ टाटा | ५०६ | ५८५ | ६३९ |
| २ बिर्ला | ४५८ | ५७६ | ६३० |
| ३ मार्टिन बर्न्स | १५३ | १७० | १७६ |
| ४ बंगूर | १०४ | १२५ | १४० |
| ५ थापर | ९८ | १०३ | ११५ |
| ६ सुरजमल नागरमल | ९६ | १०७ | १०६ |
| ७ मफतलाल | ९३ | १३५ | १५६ |
| ८ एसीसी | ९० | १०५ | १२१ |
| ९ वालचंद | ८१ | ८६ | १०१ |
| १० श्रीराम | ७४ | १०७ | १०८ |

---

## मध्य आफ्रिकेतील चोरांना भयानक शिक्षा

सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिकच्या बँग्वी तुरुंगाच्या उघड्या जागेत चोरीसाठी शिक्षा झालेले ४५ चोर आणून ठेवले आणि त्या देशाचा अध्यक्ष जीन बेडेल बोकासा स्वतः बरोबर सैनिक घेऊन तेथे आला; त्या प्रत्येक सैनिकाच्या हातात लाकडी बडगा होता. "प्रत्येकाने एक कैदी ताब्यात घ्या, तुम्ही थकेपर्यंत त्या कैद्याला बडवून काढा. कैदी मरेपर्यंत मारीत राहा." सैनिकांनी किंचाळ्या फोडणाऱ्या कैद्यांची हाडे मोडली; त्यांच्या जखमातून रक्त वाहू लागले. बोकासा हे सर्व पाहात उभा होता. 'हे निर्दय वाटेल. पण जीवनच तस आहे' असे तो तेथील एका ब्रिटिश वृत्तपत्रकाराला म्हणाला. कायदा आणि सुव्यवस्था आपल्या देशात प्रस्थापित करण्याची प्रेसिडेंट बोकासाची ही पद्धत आहे. ४५ कैद्यांपैकी ३ कैदी मेले. उरलेल्या ४२ कैद्यांना आणि ३ कैद्यांच्या प्रेतांना सार्वजनिक ठिकाणी प्रखर उन्हात पाच तास लोकांना दहशत बसावी म्हणून ठेवण्यात आले. हजारो लोकांनी हा देखावा पाहिला. चोरीच्या गुन्हेगारांना दर शनिवारी सैनिकांकरवी असे बेदम ठोकण्यात येते. "सर्व चोर मरून गेले पाहिजेत. सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिकमध्ये चोर शिल्लकच राहता कामा नयेत" असे प्रेसिडेंट बोकासाने जाहीर केले आहे. चोरीच्या पहिल्या वेळी गुन्हेगाराचा एक कान कापला जातो; पुनः गुन्हा केल्यास दुसरा कान कापला जातो, तिसऱ्या गुन्ह्यानंतर उजवा हात तोडला जातो; चौथ्या गुन्ह्यानंतर त्याचा शिरच्छेद केला जातो.

---

## लोकभ्रमः जुने आणि नवेही

लोकभ्रमांचा फायदा घेऊन स्वतःचा स्वार्थ साधणारे लोक सर्वच क्षेत्रात सापडतात. नोटा दुप्पट करून देतो म्हणून फसविणे आणि थोड्या रकमेत बंगला बांधून देण्याचे आमिष दाखवून ठकविणे, ह्यात तसा फरक नाहीच अर्थात हे झाले लौकिक व्यवहारातील लोकभ्रम. तथापि लोकभ्रमाची खरी चलती दैनंदिन व्यवहारांच्या बाहेरील क्षेत्रात दिसून येते. भारताप्रमाणे इतर मागासलेल्या देशांत असे अनेक प्रकारचे लोकभ्रम लोकांच्या मनात कायमचे ठसून गेलेले आहेत. आधुनिक इजिप्त अद्ययावत् रशियन शस्त्रास्त्रे मिळवून इस्राइलशी लढण्याची उमेद धरीत असला तरी त्या देशातील ग्रामीण भागात लोकभ्रमाचे साम्राज्य आजही चालू आहे. तेथील एका वृत्तपत्राने अशा २७४ लोकभ्रमांची नोंद केली आहे. इजिप्तच्या ४ हजार खेड्यांतून त्यांचा अंमल विशेष दिसून येतो. कुमारींनी सूर्यास्तानंतर आरशात पाहिले तर त्यांचे लग्नच होत नाही अशी समजूत लोकांत दृढ झालेली आहे. प्रत्येक खेड्यातून गंडेदोरे बांधणारे अगर मंतरलेला ताईत देणारे मांत्रिक असतात. ग्रामीण भागात ९० टक्के लोक लोकभ्रमावर विश्वास ठेवणारे आढळतात. शहरी भागांतही त्यांचे प्रमाण ६२ टक्के आहे. जुन्यांच्या जोडीला काही नवीनही निर्माण झालेले आहेत. रेल्वेच्या दोन रुळात पडून गाडी वरून जाऊ दिली तर वांझपणा जातो अशी समजूत प्रचलित आहे. घोड्याच्या पायातून गळून पडलेला नाल गुरांच्या गळ्यात बांधला तर त्याचे संरक्षण होते असा शेतकऱ्यांचा समज आहे.

---

## गोगटे बृहन्महाराष्ट्र स्टील्स लि.

महाराष्ट्रात माइल्ड आणि स्पेशल स्टील बिलेट्स तयार करण्यासाठी भारत सरकारने मेसर्स गोगटे मिनरल्सला लेटर ऑफ इंटेंट दिलेले आहे. बेळगावचे सुप्रसिद्ध उद्योगपती श्री. बी. एम. (रावसाहेब) गोगटे हे ह्या फर्मचे भागीदार आहेत. गोगटे बृहन्महाराष्ट्र स्टील्स लि. ह्या नावाची पब्लिक लिमिटेड कंपनी हा कारखाना उभारणार आहे, त्यात बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. ने सहभागी व्हावे ह्यासाठी श्री गोगटे ह्यांनी सिंडिकेट बरोबर वाटाघाटी केल्या. नव्या कंपनीत बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटने १८,७५,००० रुपयांचे म्हणजे विक्रीस काढावयाच्या भागांच्या २५% किमतीचे भाग घ्यावेत अशी कल्पना आहे. ही रक्कम बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या वसूल भांडवलाच्या ६६·११% एवढी भरते. ह्या गुंतवणुकीस सिंडिकेटने स्वतःच्या भागधारकांची संमती मागितली आहे. श्री. ज्ञानेश्वर आगाशे हे नव्या कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर बहुधा होतील.

---

## सी. जी. आगाशे ट्रस्टला बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटची ५ लक्ष रु. ची देणगी

समाजोपयोगी कार्य करण्यासाठी सी. जी. आगाशे ट्रस्ट स्थापन करण्यात आला आहे. हा ट्रस्ट पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट आहे. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटचे जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर्स श्री. जगदीश आगाशे आणि श्री. ज्ञानेश्वर आगाशे हे त्या ट्रस्टचे ट्रस्टी आहेत. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या डायरेक्टरांनी ह्या ट्रस्टला ५ लक्ष रुपयांची देणगी देण्याबाबत शिफारस केली आहे. सिंडिकेटच्या येत्या विशेष साधारण सभेत त्याबाबत ठराव भागधारकांच्या मंजुरीसाठी मांडला जाईल.

---

**विमानातील कर्मचाऱ्यांची व्हिस्कीची चोरी** – एका मोठ्या अमेरिकन विमान कंपनीने हेर नेमून आणि हिशेबाची कसून तपासणी करून आपल्या उत्पन्नातील गळती थांबविण्याचे ठरविले, तेव्हा कंपनीच्या विमानातील कर्मचारी दरसाल २ कोटी, ८० लक्ष रु. ची व्हिस्की पळवीत होते असे आढळून आले.

**चीनमध्ये इंग्रजी भाषेचे महत्त्व वाढले** – आतापर्यंत चीनमध्ये फक्त लष्करी भाषा-शाळांतून इंग्रजी शिकविले जाई. आता चीनचे आंतरराष्ट्रीय संबंध वाढत असल्यामुळे दुभाषे, सहलीचे मार्गदर्शक, राजकारणपटू, ह्यांची इंग्रजीची गरज वाढत आहे. फ्रान्स, ग्रेट ब्रिटन इटली, इत्यादी देशांत इंग्रजी शिकण्यासाठी विद्यार्थी पाठविण्यात येऊ लागले आहेत.

### अशा उच्च शिक्षितांकडून नुकसानभरपाई का घेऊ नये?

हिंदमध्ये उच्च शिक्षण घेतलेले अनेक पदवीधर परदेशी जाण्याचे प्रयत्न करीत असतात. कित्येकदा त्यांनी घेतलेल्या शिक्षणाचा स्वदेशात उपयोग होण्यासारखाही नसतो. पण उच्च शिक्षण घेतलेले एंजिनिअर्स, डॉक्टर्स अगर इतर तंत्रज्ञ मोठ्या पगाराच्या अभिलाषानेही परदेशी जातात आणि जमले तर तेथेच स्थायिक होण्याचाही प्रयत्न करतात. ह्याचा अर्थ त्यांच्या शिक्षणासाठी देशात खर्च झालेला पैसा फुकट गेला असाच होतो. डॉक्टर्सच्या बाबतीत हा खर्च कसा व किती वाया जातो तो पाहणे बोधप्रद आहे. हिशेब असा आहे की एक तयार डॉक्टर जर परदेशी गेला तर त्याच्या शिक्षणासाठी खर्च झालेल्या ८० हजार रुपयांचा देशाला काहीही उपयोग होत नाही. देशात ग्रामीण भागात डॉक्टर्स जाण्यास तयार नसतात. सर्वजण शहरातच गर्दी करतात. ह्या वृत्तीला अनेक खरीखोटी कारणे असली त्यामुळे खेडेगावांत वैद्यकीय उपचारांच्या सोयी बेताबेतानेच मिळू शकतात. हाही त्यांच्या शिक्षणाचा अपव्ययच म्हटला पाहिजे. भारताप्रमाणेच रशिआतूनही अनेक तंत्रज्ञ व उच्च शिक्षित लोक बाहेर जाण्याच्या खटपटीत असतात. अर्थात त्यांचे प्रमाण अल्प आहे. अशा लोकांकडून परदेशी जाण्याची परवानगी मिळण्यासाठी म्हणून नुकसानभरपाई घेण्याचा निर्णय रशिआने घेतला आहे. उच्च शिक्षण घेतलेले तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ अगर शिक्षणतज्ज्ञ ह्यांच्याकडून नुकसानभरपाई म्हणून ५ हजार डॉलर्सपासून २५ हजार डॉलर्सपर्यंत रक्कम घेण्यात येते. अशी पद्धत भारतात का सुरू करण्यात येऊ नये? नुकसानभरपाईची रक्कम शिक्षणासाठी उपयोगात आणता येईल.

---

### चीनने नकाराचा अधिकार का वापरला?

नवोदित बांगला देशाला संयुक्त राष्ट्रसंघटनेत स्थान देण्यास ८७ देशांचा पाठिंबा आहे. पण हा विषय सुरक्षा समितीत आला तेव्हा चीनने आपला नकाराधिकार वापरून बांगला देशाला संघटनेबाहेर रोखून धरले. लोकक्रांतीचा पाठीराखा म्हणून वेळी-अवेळी टेंभा मिरविणाऱ्या चीनने हे धोरण का स्वीकारले? चीनच्या ह्या धोरणावर प्रकाश टाकणारे एक पुस्तक अलीकडे प्रसिद्ध झाले आहे. पुस्तकाचे लेखक आहेत फ्रान्सचे माजी मुख्य प्रधान पिअरे-मेंडे फ्रान्स. चीनचे पंतप्रधान ह्यांच्याशी भोजनप्रसंगी झालेल्या संवादाचा त्यांनी हवाला दिला आहे. पंतप्रधान चौ एन-लाय ह्यांच्या मनात रशिया चीनवर घणाघाती आघात करील आणि तोही लवकरच, अशी भीती घर करून राहिली आहे. उत्तरेकडून मंगोलियाच्या बाजूने रशिया व दक्षिणेकडून भारत बांगला देश ही युती चीनवर हल्ला करण्यास टपलेली आहेत, असा त्यांचा समज झालेला आहे. त्यांना आता अमेरिका चीनवर हल्ला करील असे वाटत नाही. १९५८ पर्यंत त्यांना अशी भीती वाटत होती. पण, आता मात्र अमेरिकेविरुद्ध वापरण्यात येणारी कडक भाषा रशियाच्या वाट्याला येऊ लागली आहे. भारताबद्दल चीनचे धोरण थोडे नरम होण्याच्या मार्गावर होते. परंतु बांगला देशाच्या मुक्ततेपासून ते पुन्हा ताठर होऊं लागलेले दिसते. मि. फ्रान्स ह्यांच्याशी भारताबद्दल बोलताना चौ एन-लाय म्हणाले की भारताच्या आसपास गडबडगोंधळ चालूच राहील. भारताने काडी पेटवून आग शिलगावली आहे. तिचे चटके भारताला बसणे अपरिहार्य आहे.

---

### रेल्वेने प्रवास करणारे फुकटे प्रवासी

तिकिट न काढता रेल्वेने प्रवास करणाऱ्यांना आळा घालण्यासाठी रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी अशा प्रवाशांना पकडण्याची मोहीम काढली होती. हे काम करण्यासाठी त्यांनी जी तपासणी केली त्यावरून असे दिसून येते की फुकट्या प्रवाशांमुळे रेल्वेला दरसाल २० ते २५ कोटी रुपयांचे नुकसान सोसावे लागते. फुकट्या प्रवाशांची तपशीलवार माहिती गोळा करताना असे आढळून आले की त्यांतील सर्वांत अधिक प्रवासी खेड्यात राहणारे व शेतकरी असतात. त्यांची टक्केवारी ३२ टक्के आहे. ह्या वर्गाखालोखाल व्यापारधंदे करणारे लोक येतात. त्यांची टक्केवारी २३ टक्के आहे. त्यानंतर मजूर २२ टक्के, भिकारी १२ टक्के, विद्यार्थी ९ टक्के आणि नौकरी करणारे २ टक्के असल्याचे दिसून आले. ईशान्य रेल्वेवर फुकटे प्रवासी अधिक पकडले गेले.

---

### संपूर्ण स्वदेशी बनावटीचा 'स्वराज्य' ट्रॅक्टर

दुर्गापूर येथील यांत्रिक संशोधन संघटनेने संपूर्ण स्वदेशी बनावटीचा ट्रॅक्टर बनविण्यात यश मिळविले आहे. त्याचा नमुना देशातच तयार करण्यात आला असून अनेक भागांत त्याची चाचणीही करण्यात आली आहे. पंजाब ट्रॅक्टर्स लि. ह्या कारखान्यातून हा नवा ट्रॅक्टर १९७३ च्या सप्टेंबर महिन्यात बाहेर पडेल. त्याचे नाव 'स्वराज्य' असे ठेवण्यात आले आहे. कारखान्याच्या पहिल्या टप्प्यात २० ते ३० अश्वशक्तीचे ५ हजार ट्रॅक्टर्स बनविण्यात येतील. ट्रॅक्टरच्या कारखान्यात ३·७ कोटी रुपये भांडवल गुंतवले जाईल. हिंदी तंत्रशास्त्रावर आधारलेल्या कारखान्यात होणारी ही सर्वांत मोठी भांडवल गुंतणूक आहे.

---

### रेव्हरंड स्त्रीचा प्रेमविवाह

शर्ले कार्टर ह्या बॅप्टिस्ट रेव्हरंड स्त्रीचा फादर प्रिंगल ली ह्या रोमन कॅथॉलिक प्रीस्टबरोबर गेल्या मे महिन्यात कोलंबियातील एका बॅप्टिस्ट चर्चमध्ये विवाह झाला. विवाहानंतर सहा महिन्यांनीच ती माता होणार असल्याचे समजताच ती 'रेव्हरंड' उरली नाही. तिला राजीनामा देणे भाग पाडण्यात आले. "आमचा विवाह परमेश्वराच्या साक्षीनेच झाला. विवाह समारंभापासूनच विवाहाला प्रारंभ होतो, असे बायबलमध्ये कुठेच म्हटलेले आम्हांस आढळले नाही" असे तिचे म्हणणे आहे.

### सुगंधी वस्तूंच्या निर्यातीला मोठा वाव

संयुक्त राष्ट्र संघटनेची औद्योगिक विकास संघटना ह्या नावाची एक शाखा आहे. ह्या संघटनेचे बाजार-प्रमुख भारतात आले होते. भारताच्या निर्यात व्यापार वृद्धी संघटनेशी व परदेशीय व्यापार खात्याशी सहकार्य करून त्यांनी एक अहवाल भारत सरकारला सादर केला आहे. ते आपल्या अहवालात म्हणतात की सुगंधी द्रव्ये आणि वस्तू ह्यांच्या निर्यातीत भारत पुन्हा प्रमुख स्थान मिळवू शकेल. पण त्यासाठी ह्या उद्योगधंद्याचा पाया विस्तृत करण्यात आला पाहिजे आणि त्याला निर्यातीचे वळण लावण्यात आले पाहिजे. असे करण्यात आले तर सुगंधी तेले, अत्तरे, साबण ह्यांची निर्यात येत्या पाच वर्षांच्या अवधीत दरसाल १५ कोटी रुपयांपर्यंत वाढविता येणे शक्य आहे. त्यासाठी मालाचा दर्जा प्रमाणित करून अमेरिकेतील व युरोपमधील ग्राहकांच्या चोखंदळ निवडीला पटेल अशी निर्मिती करण्यात आली पाहिजे. सध्या सुगंधी द्रव्यांच्या व्यापारात भारताचे स्थान बरेच खाली आहे. फ्रान्स, अमेरिका आणि जपान ह्या देशांत हा धंदा खूप सुधारलेला आहे. रासायनिक प्रक्रियेने बनविलेल्या सुगंधी वस्तूंनी खऱ्या व नैसर्गिक सुगंधी वस्तूंची जागा घेतली आहे. म्हणून भारताने शक्य तितक्या लवकर सुगंधी द्रव्यांचा आपला धंदा अद्ययावत शास्त्रीय शोधांच्या साह्याने विकसित केला पाहिजे. भारताजवळ जरूर ती साधनसंपत्ती आणि कौशल्यही आहे. परंतु विक्रयकलेच्या वापराने मालाची प्रसिद्धी परदेशी बाजारांतून करण्यात आली पाहिजे.

---

### धरणे बांधण्यासाठी राज्यांचे सहकार्य

भारतामधील जलसंपत्तीचा अद्याप पूर्णपणे उपयोग करून घेण्यात येत नाही. अशा उपयोगाच्या मार्गात आता तांत्रिक अडचणी फारशा राहिलेल्या नाहीत. परंतु भिन्न भिन्न राज्यांतून वाहणाऱ्या नद्यांच्या पाण्याच्या वाट्याबद्दल संबंधित राज्यांचे मतभेद होतात आणि अनेक उपयुक्त विकासयोजना धूळ खात सरकारदप्तरी पडून राहतात. ह्या बाबतीत उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेश ह्या राज्यांच्या सरकारांनी सहकार्याचा नवा प्रघात पाडण्याचा निर्णय घेतलेला आहे. दोन्ही राज्यांना लाभकारक ठरणारी अनेक धरणे बांधण्यासाठी मध्यवर्ती सरकारने पुढाकार घ्यावा अशी विनंती उभयता राज्यांच्या मुख्य मंत्र्यांनी करण्याचे ठरविले आहे. ह्यासंबंधी त्यांच्यात मतैक्य झाले आहे. ह्या धरणात बांधाजवळ बांधण्यात यावयाच्या एका मोठ्या धरणाचा समावेश आहे. त्यासाठी सुमारे २०० कोटी रुपये खर्च लागणार आहे. धरणाची जागा मध्यप्रदेशात आहे व त्यात पावसाळी पाणी साठविण्यात यावयाचे आहे. धरणातील पाण्याने उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेश राज्यातील १० लाख एकर जमीन ओलिताखाली येऊ शकेल आणि २०० मेगॅवॅट विजेची निर्मितीही होऊ शकेल. ह्या धरणाप्रमाणेच दोन्ही राज्यांच्या सीमेवर बेटवा नदीवर राजघाट ह्या ठिकाणीही एक धरण बांधण्याचे ठरविण्यात आले आहे. ह्या धरणासाठी ५० कोटी रुपये लागतील आणि झांसी जिल्ह्याला पाणीपुरवठा होऊ शकेल. संकल्पित धरणे आणि नालिकाकूप ह्यांच्या साहाय्याने उत्तर प्रदेशातील बुंदेलखंड हा नापीक भाग भरपूर धान्य पिकवू शकेल.

---

### माजी संस्थानिकांना १०·७० कोटी रुपये

हिंदमधील माजी संस्थानिकांचे तनखे आणि खास हक्क रद्द करण्यात आल्यावर त्यांना आर्थिक अडचणींना एकदम तोंड द्यावे लागू नये म्हणून एकदाच १०·७० कोटी रुपये देण्यात येणार आहेत. ज्या संस्थानिकांचा तनखा १ लाखापेक्षा अधिक होता, त्यांना एकदाच वार्षिक तनख्याची रक्कम देण्यात येईल. ज्यांना वार्षिक ३५ हजारांपर्यंत तनखा मिळत होता, त्यांना तनख्याच्या ८ पट रक्कम एकदम व एकदा देण्यात येईल. ज्यांना ३५ हजारांपेक्षा अधिक पण ५० हजारांपेक्षा कमी तनखा होता, त्यांना तनख्याच्या ६ पट रक्कम देण्यात येईल. ज्यांना ५० हजार ते १ लाखापर्यंत तनखा होता त्यांना चौपट रक्कम देण्यात येईल. ह्या रकमांवर प्राप्तिकर घेण्यात येणार नाही.

---

**गव्हाची नवी जात** – पंजाब शेतकी विद्यापीठातील शेतीशास्त्रज्ञांनी गव्हाची नवी जात शोधून काढली आहे. ही जात गव्हावर पडणाऱ्या रोगाला बळी पडत नाही. शिवाय पोळ्या आणि पाव करण्यासाठी नव्या जातीच्या गव्हाचे पीठ विशेष चांगले आहे. ह्या जातीची चाचणी घेण्यात आली आहे. तिचे बियाणे लवकरच शेतकऱ्यांना उपलब्ध होईल.

**बाजारपेठेचा शोध** – पाकिस्तानमधील कापसाला बाजारपेठ शोधण्यासाठी पाकिस्तानचे एक व्यापारी मंडळ हाँगकाँग आणि जपानला गेले आहे. तेथील बाजारपेठेचा अभ्यास करण्याचा मंडळाचा विचार आहे. गेल्या वर्षी पाकिस्तानकडून कापसाची आयात करण्यात जपान व हाँगकाँग अग्रेसर होते. दोन्ही देशांनी प्रत्येकी ४ लाख गासड्या कापूस आयात केला.

**महाराष्ट्र बँकेची मद्रास शाखा**—महाराष्ट्र बँकेची तामीळनाड राज्यातील पहिली शाखा मद्रास येथे दि. १९ ऑगस्ट रोजी राज्यपाल श्री. के. के शहा ह्यांच्या हस्ते उघडण्यात आली. त्या वेळी बँकेचे कस्टोडियन श्री. चिं. वि. जोग ह्यांनी स्वागताच्या भाषणाचा प्रारंभ तामीळ भाषेत करून पुढे इंग्रजीत ते बोलले.

**हिंदुस्थान स्पिनिंगच्या विक्रीत वाढ**—हिंदुस्थान स्पिनिंग अँड व्हीविंग मिल्स कंपनीने ३१ मार्च, १९७२ अखेर संपलेल्या वर्षी १९ कोटी रु. ची विक्री केली; मागील वर्षी ती १६ कोटी रु. ची झाली होती. ढोक नफा ७२·७१ लक्ष रु. चा ८४·८५ लक्ष रु. झाला. डिव्हिडंडचा दर प्रत्येक शेअरला २५ रु. कायम ठेवण्यात आला आहे. कंपनीच्या २५० रु. च्या शेअरची किंमत रु. ३८७=५० आहे.




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)